महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : जीआरसी-७३२२/प्र.क.८४/२०२२/एक दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२२

**सेवानिवृत्त अवर सचिव यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागातील अवर सचिव पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या सेवा प्रवेशनियम/सेवा विषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या एका अधिकाऱ्याची प्रथमत: ६ महिन्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर नियूक्ती प्रथमत: ६ महिन्यांकरीता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण-२७१५/प्र. क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार करण्यात येणार आहे.

२) शासनाच्या किंवा आयोगाच्या कार्यालयातील सेवानिवृत्त अवर सचिव असावेत.

३) आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागातील सेवाप्रवेश नियम अथवा सेवा विषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेला सेवानिवृत्त अवर सचिव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६२ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारणा करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचे अर्ज desk5.mpsc@maharashtra.gov.in या मेल आयडीवर अथवा सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग ५१/२ वा मजला,कुपरेज टेलिफोन निगम इमारत,महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई – ४०० ०२१ या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२७९५९११/०२२-२२७९५९१२ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार आयोगाच्या कार्यालयाचा राहिल.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अवर सचिव यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अवर सचिव, सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या नियंत्रणाखाली काम करतील व त्यांना कामकाजाचा अहवाल दरमहा सादर करतील.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

उप सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त अवर सचिव यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :-..........................................................................................................

२) अर्जदाराचा पत्ता :-..........................................................................................................

३) सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-..........................................................................................................

४) भ्रमणध्वनी क्रंमाक :-..........................................................................................................

५) जन्म दिनांक व वय :-..........................................................................................................

६) आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? :- होय/ नाही

७) अनुभव :-..........................................................................................................

आयोगाच्या किंवा मंत्रालयीन विभागातील सेवाप्रवेश नियम तसेच सेवा विषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या सेवानिवृत्त अवर सचिव यांची प्रथमत: ६ महिन्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची जाहिरात/ सूचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी